follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २९० सातारा * शनिवार * दि. ६ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

## टीम इंडियाला महाराष्ट्र सरकारकडून ११ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर

**मुंबई :** मुख्यमंत्री शिंदेंची मोठी घोषणा; 'एवढ्या' कोटींचं बक्षीस जाहीर

टी-२० विश्वचषक २०२४ च्या जेतेपदावर भारतीय संघाने आपले नाव कोरल्यानंतर आता भारतीय संघावर बक्षीसांचा अक्षरश: पाऊस पडत आहे. दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या अंतिम सामन्यात ७ धावांनी भारताने शानदार विजय मिळवला. तब्बल १७ वर्षांनी भारताने टी-२० वर्ल्डकपचे जेतेपद पटकावले आहे. त्या पार्श्वभीमीवर मुंबईत ४ जुलै रोजी भारतीय संघाचं जंगी स्वागत करण्यात आलं.



भारतीय संघाच्या स्वागतासाठी हजारोंच्या संख्येनं मुंबईकर मरीन ड्राईव्हवर काल उपस्थित होते. काल विजय परेड पार पडल्यानंतर आज भारतीय संघातील चार मुंबईकर खेळाडूंचा महाराष्ट्राच्या विधानभवनात सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारतीय संघासाठी मोठी घोषणा केली. महाराष्ट्र सरकारकडून भारतीय संघाला तब्बल ११ कोटी रुपयांचं बक्षिस देण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी केली. यासंदर्भातील माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी ट्विटरवर पोस्ट करतही दिली आहे.

महाराष्ट्र सरकारकडून विश्वविजेत्या टीम इंडियासाठी ११ कोटी रुपयांचं बक्षिस जाहीर करण्यात आलं आहे. तसेच मुंबई महानगर क्षेत्रात भविष्यात भव्य आणि आधुनिक असे स्टेडियम उभारण्यास गती देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं की, भारत हा क्रिकेटमध्ये विश्वगुरू आहे. हे आपल्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाने सिद्ध केलं आहे. पराभवाच्या छायेतून विजय खेचून आणून कर्णधार रोहित शर्मा आणि त्याच्या संघाने भारतीयांची छाती अभिमानाने फुलून यावी, अशी कामगिरी केली आहे, असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

दरम्यान, विश्वविजेत्या टीम इंडियासाठी आज विधानभवनात सत्कार समारंभाच्या कार्यक्रमासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह आदी महत्वाचे नेते उपस्थित होते.

## पात्र विद्यार्थिनींना मिळणार मोफत व्यावसायिक शिक्षण

**मुंबई :** उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या वाढावी या दृष्टीने मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार इतर मागासवर्ग, आर्थिक दृष्ट्या मागासवर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींना मोफत व्यावसायिक शिक्षणाचा लाभ घेता येणार आहे. या प्रवर्गातील कुटुंबांसाठी हा मोठा दिलासा देणारा निर्णय ठरणार आहे.

यापूर्वी इतर मागासवर्ग, आर्थिक दृष्ट्या मागासवर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क यांच्या रकमेच्या ५० टक्के रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडून केली जात असे. या पुढील काळात



ही संपूर्ण रक्कम शासनाकडून दिली जाणार आहे. त्यामुळे व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या उल्लेखनीय रित्या वाढण्याची अपेक्षा आहे.

**विधान परिषद सभापती पदाचीही चर्चा**

सध्या विधान परिषदेचे सभापतीपाद रिक्त आहे. डॉ नीलम गोऱ्हे या कार्यवाहक सभापती म्हणून कामकाज चालवत आहेत. विधान परिषद सभापती पदासाठी काही संभाव्य नावांची चर्चाही मंत्रिमंडळ बैठकीत झाल्याचे सत्ताधारी गोटातून सांगण्यात आले.

## महत्त्वाचे

### नाफेडमध्ये घोटाळा; व्यवस्थापकीय संचालकांसह अकाउंटंटची उचलबांगडी

**नाशिक :** केंद्र शासन अंगीकृत नाफेडसह एनसीसीएफ संस्थेत कांदा खरेदीत घोटाळा झाल्याची ओरड शेतकऱ्यांकडून सातत्याने होत असल्याने नाफेडचे दिल्लीतील सहायक व्यवस्थापकीय संचालक (ए.एम.डी) सुनीलकुमार सिंग, तसेच नाफेडच्या नाशिक कार्यालयातील अकाउंटंट (लेखापाल) हिमांशू त्रिवेदी यांची उचलबांगडी करण्यात आली आहे.

सुनीलकुमार यांच्याकडून कांदा विभागाची जबाबदारी काढून घेण्यात आली असून, हिमांशू यांची नाशिकहून मुंबईच्या कार्यालयात तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. केंद्रीय कृषी पथक चार दिवसांपासून नाशिक जिल्ह्यात असून, त्यांनीच केंद्राला अहवाल देऊन कारवाईचे सूचित केल्याचे वृत्त आहे. नाफेडच्या अध्यक्षांनीही २१ जून रोजी कांदा खरेदी केंद्रांवर धाड मारली होती.

नाफेडच्या दोन अधिकाऱ्यांची उचलबांगडी करण्यात आली असली तरी एनसीसीएफच्या अधिकाऱ्यांना मात्र अजून तरी अभय देण्यात आले आहे. नाशिकसह राज्यभरातील नाफेडसह एनसीसीएफच्या कांदा खरेदी केंद्रांत घोटाळा झाला असल्याचा संशय होता. त्या अनुषंगाने मागील सहा दिवसांपासून केंद्रीय कृषी समिती नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहे. समितीने अचानक दौरा करत नाफेडच्या दिंडोरीसह अन्य कांदा खरेदी केंद्रावर तपासणी केली होती. त्यात शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी आलेला कांदा व तेथे एकूण दाखल कांदा यात मोठी तफावत आढळून आली होती, तसेच इतर गैरबाबीही प्रकर्षाने जाणवल्या होत्या. त्या अनुषंगाने समितीने आपला अहवाल केंद्राला पाठविला. त्याचमुळे सुनिलकुमार व हिमांशु त्रिवेदी यांची तातडीने उचलबांगडी करण्यात आली. मात्र यात अजून काही अधिकारी, कर्मचारी चौकशीच्या फेऱ्यात अडकण्याची शक्यता आहे. नाफेड व एनसीसीएफने यंदाही देशभरातून पाच लाख टन कांदा खरेदी करण्याचा निर्णय मे महिन्यात घेतला होता.

## शासकीय योजनांचा गैरवापर सहन करणार नाही : रोहित पवार

**मुंबई :** शासकीय योजना लोकांच्या कल्याणाऐवजी केवळ राजकीय लाभ उठवण्यासाठी राबविल्या जाणार असतील तर आम्ही ते सहन करणार नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारला दिला आहे.

मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी ही योजना घोषणेपासूनच वादग्रस्त ठरली आहे. पात्र महिलांना दरमहा पंधराशे रुपये देणारी ही योजना महिलांच्या काळजीमुळे नव्हे तर आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मतदारांना आकर्षित करण्यासाठी आणली असल्याचा विरोधकांचा आरोप



आहे.

मात्र, सरकार या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी आग्रही असून अंमलबजावणीतील अडचणी आणि लोकांच्या मागण्या लक्षात घेऊन पात्रतेचे निकष अधिकाधिक सैल केले जात आहेत. आता विरोधकांनी योजनेच्या अर्जावरील नेत्यांच्या छायाचित्रांवरून सरकारला लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे.

मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी या योजनेचा लाभ घेण्यासाठी करण्याच्या अर्जावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासहमंत्री आदिती तटकरे यांचे छायाचित्र आहे. शासकीय योजनेच्या अर्जावर अशाप्रकारे नेत्यांची छायाचित्र प्रसिद्ध करण्यास रोहित पवार यांनी आक्षेप घेतला आहे. आगामी निवडणूक नजरेसमोर ठेवून सरकार या योजनेचा वापर करून घेत आहे सरकार या योजनेचा एवढा गाजावाजा करत असले तरीही प्रत्यक्षात या योजनेसाठी केवळ दहा हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद अत्यंत तोकडी आहे. यावरूनच सरकारचा ही योजना राबविण्यात मागचा हेतू प्रामाणिक नसल्याचे दिसून येत आहे, असे रोहित पवार यांनी नमूद केले.

राज्यात लोकसभा निवडणुकीत महायुतीला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सरकारने मतदारांची दिशाभूल करणारी ही योजना अमलात आणली आहे. वास्तविक शासकीय योजना या जनतेच्या कल्याणासाठी राबविल्यास आणि अपेक्षित आहे.

## विधानसभेसाठी रणनीती आणि विधान परिषदेसाठी मतांची जुळवा जुळव

### 'मविआ'च्या बैठकीत काय काय ठरलं?

**मुंबई :** महाविकास आघाडीची मुंबईमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सेंटरमध्ये आज बैठक पार पडली. त्या बैठकीमध्ये प्रामुख्याने उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले, बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, जितेंद्र आव्हाड, संजय राऊत, विजय वडेट्टीवार, रोहित पवार, आदित्य ठाकरे हे सर्व महत्त्वाचे नेते उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणूक आणि १२ जुलै रोजी होणार्या विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्शभूमीवर ही बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीमध्ये मविआच्या नेत्यांमध्ये सखोल चर्चा झाली. विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने तिन्ही उमेदवार निवडून आणण्यासाठी रणनीती आखली आहे.

महाविकास आघाडीच्या आजच्या बैठकीत नेमकं काय ठरलं ?

१२ जुलैला होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी मतांची जुळवाजुळव व्हावी, यासाठी काही महत्त्वाच्या नेत्यांकडे जबाबदारी देण्यात आली आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने तिन्ही उमेदवार निवडून आणण्यासाठी रणनीती आखली आहे. विधान परिषद सोबत विधानसभा निवडणुकीसाठी लवकरच जागावाटप संदर्भात चर्चा सुरू केल्या जातील. जागावाटप संदर्भात प्राथमिक चर्चा या बैठकीत झाली.

## आर्मस्ट्राँग यांच्यावर हल्ला, ६ आरोपींनी घरासमोरच केली हत्या



**तामिळनाडू :** आर्मस्ट्राँग पेरंबूरजवळ सेम्बियममध्ये गर्दीच्या ठिकाणी आपल्या घराजवळ मित्र आणि समर्थकांसोबत बोलत असतानाच, गुन्हेगारांनी त्यांच्यावर हल्ला केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बहुजन समाज पार्टीचे (बीएसपी) तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष आर्मस्ट्राँग यांची चेन्नईमध्ये त्यांच्या घराजवळच ६ जणांनी हत्या केल्याची घटना घडली आहे. आरोपी पेरंबूर भागातील सदायप्पन स्ट्रीटवर त्यांना चाकू मारून फरार झाले. सध्या पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

माध्यमांतील वृत्तांनुसार, आर्मस्ट्राँग पेरंबूरजवळ सेम्बियममध्ये गर्दीच्या ठिकाणी आपल्या घराजवळ मित्र आणि समर्थकांसोबत बोलत असतानाच, गुन्हेगारांनी त्यांच्यावर हल्ला केला. सायंकाळी साधारणपणे सात वाजण्याच्या सुमारास तीन बाइकवरून गुन्हेगार आले आणि त्यांनी आर्मस्ट्राँग यांची हत्या केली.

## ऋषी सुनक यांना भोवली भारतीयांची नाराजी

**लंडन :** ब्रिटनमध्ये तब्बल १४ वर्षानंतर सत्तांतर होत असून सत्तारूढ हुजूर पक्षाचा पराभव करून मजूर पक्षाने ४०० पेक्षा अधिक जागा जिंकत सत्तेकडे घोडदौड चालू केली आहे. पंतप्रधान ऋषी सुनक यांच्याकडून भारतीय वंशाच्या नागरिकांचा झालेला अपेक्षाभंग हुजूर पक्षाला भोवला असून त्यांच्या पराभवाचे हे देखील प्रमुख कारण ठरले आहे.

ब्रिटनमध्ये तब्बल १८ लाख भारतीय वंशाचे मतदार आहेत. ऋषी सुनक यांनी पंतप्रधान पदाची धुरा हाती घेतल्यानंतर भारतीय वंशाच्या नागरिकांच्या त्यांच्याकडून खूप मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, ते आपल्या अपेक्षा पूर्ण करू शकले नाहीत, अशी भावना बहुसंख्य भारतीय वंशाच्या मतदारांमध्ये आहे. त्यामुळे त्यांच्या मतांपैकी तब्बल ६५ टक्क्यांहून अधिक मते



हुजूर पक्षाच्या विरोधात गेल्याचे निरीक्षण नोंदविले गेले आहे. हे त्यांच्या पराभवाचे महत्त्वाचे कारण आहे.

याशिवाय ऋषी सुनक यांचे सरकार आर्थिक आघाडीवर सपशेल यशस्वी ठरले. ब्रिटनला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यास या सरकारला पूर्ण अपयश आले. ब्रिटनमध्ये राहत्या गडांची समस्या बिकट बनलेली असताना त्यावर सरकार कोणताही उपाय करू शकली नाही. त्याचवेळी निवडणूक प्रचारादरम्यान मजूर पक्षाने लाखो घरांच्या उभारणीची योजना मतदारांच्या समोर मांडली. ती मतदारांच्या पसंतीला उतरली. ब्रिटनमध्ये महागाईने कळस गाठला असून महागाई कमी करण्यात या सरकारला अपयश आले. या महागाईमुळे दैनंदिन खर्च भागवणे ही ब्रिटिश नागरिकांसाठी मुश्किल ठरले आहे. त्यामुळे महागाई हे मतदारांच्या नाराजीचे एक प्रमुख कारण ठरले.

**मतदारांच्या नाराजीची कारणे**

एकीकडे महागाईने कळस गाठलेला असतानाच वारंवार करांमध्ये वाढ करू सरकारने नागरिकांच्या खिशाला कात्री लावली. त्यामुळे मतदारांच्या संतापात भर पडली. विदेशी नागरिकांची घुसखोरी ही ब्रिटनसमोर मोठे संकट बनले आहे. व्यवसायाच्या निमित्ताने अथवा शरणार्थी म्हणून मोठ्या प्रमाणावर विदेशी नागरिक जलमार्गाने ब्रिटनमध्ये प्रवेश करीत आहेत. आपल्या जल सीमा सुरक्षित करून या घुसखोरीला आळा घालण्यास सरकारला अपयश आल्याची मतदारांची भावना आहे. त्याचप्रमाणे एकूणच कायदा सुव्यवस्था राखण्यात हे सरकार अपयशी ठरले.

**युरोपीय संघ सोडणे पडले महागात**

युरोपीय संघात ब्रिटनची गळचेपी होत असल्याच्या कारणावरून ब्रिटनने युरोपीय संघातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय अंगाशी आल्याचे आता दिसून येत आहे. सदस्य राष्ट्रांवर आग पाखर करून आणि स्वदेशातील जनतेला जनमताची साद घालून युरोपीय संघातून बाहेर पडल्यानंतर ब्रिटनला मोठ्या प्रमाणावर आर्थिक समस्यांचा सामना करावा लागला आहे.

## खडकवासला आणि हडपसरमधून विधानसभा लढविण्याची तयारी

**पुणे :** लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून वंचित बहुजन आघाडीत गेलेले वसंत मोरे लवकरच शिवबंधन परिधान करून शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. आगामी विधानसभा निवडणूक लढविण्यास आपण तयार असल्याचेही मोरे यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

पुणे लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा चंग बांधलेले वसंत मोरे यांनी मनसेकडून तिकीट मिळणार नसल्याचे स्पष्ट झाल्यावर वंचित बहुजन आघाडी प्रवेश करून ही निवडणूक लढवली. मात्र, या निवडणुकीत त्यांची अनामत रक्कमही जप्त झाली. तरीही विधानसभा निवडणूक लढविण्याचा त्यांचा निर्धार कायम आहे. केवळ एकाच नव्हे तर खडकवासला आणि हडपसर अशा दोन मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची त्यांची तयारी आहे. त्यासाठी त्यांनी आता शिवसेना ठाकरे गटाची कास धरली आहे.

मी मूळचा शिवसैनिकच आहे. केवळ १८-१९ वर्षाचा असताना मी शिवसेनेची शाखा स्थापन केली. त्यानंतर एक दशकाहून अधिक काळ मी शिवसैनिक राहिलो. मागील लोकसभा निवडणुकीत वंचित कडून निवडणूक लढवीत असताना अनेकांनी आपले काम केले नाही. याबद्दल पक्षप्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा झाली होती. या गोष्टीबद्दल आपले कार्यकर्तेही मोठ्या प्रमाणावर नाराज होते. त्यामुळे कार्यकर्त्यांचा विचार करून त्यांना बळ देण्यासाठी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश करीत आहोत, असे मोरे यांनी सांगितले.

कोणत्याही प्रलोभनासाठी आपण शिवसेनेत जात नाही. विधानसभा निवडणूक लढवायची की महापालिका लढवायची, याचा निर्णय लवकरच घेतला जाईल. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे जी जबाबदारी सोपवतील ती जबाबदारी पार पाडण्यास मी तयार आहे. कार्यकर्त्यांचा विचार करून ९ जुलै रोजी मातोश्रीवर जाऊन शिवबंधन बांधणार आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी वंचित असे प्रकाश आंबेडकर यांनी आपल्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, मी त्यांना केवळ, बाळासाहेब मला माफ करा, असा निरोप पाठवला, असेही वसंत मोरे यांनी सांगितले.

## हजारो नॉन एसी डबे वाढवण्याची रेल्वेची तयारी

**मुंबई :** भारतीय रेल्वेस ामान्य नागरिकांना आनंदाची बातमी देणार आहे. मंत्रालयाने २०२४-२५ आणि २०२५-२६ मध्ये आणखी १०,००० नॉन-एसी कोच बनवण्याचे नियोजन केले आहे, यामुळे सामान्य नागरीकांना सुविधा वाढणार आहेत.

एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४,४८५ नॉन-एसी कोच आणि २०२५-२६ मध्ये आणखी ५,४४४ डबे मिळणार आहेत. याव्यतिरिक्त,रेल्वेनेआपल्या रोलिंग स्टॉकची क्षमता लक्षणीयरीत्या वाढवण्यासाठी ५,३०० हून अधिक सामान्य डबे सुरू करण्याची योजना आखली आहे.अमृतपाल सिंग यांनी घेतली खासदारकीची शपथ, विशेष विमानाने आणले दिल्लीतअधिकाऱ्यांनी सांगितले की, चालू आर्थिक वर्षात, भारतीय रेल्वे २,६०५ सामान्य डबे तयार करण्याची तयारी करत आहे, यामध्ये प्रवाशांच्या सुविधा वाढविण्यासाठी डिझाइन केलेले विशेष अमृत भारत सामान्य डब्यांचा देखील समावेश होणार आहे.

नॉन-एसी स्लीपर कोच आणि ३२३ एसएलआर कोच, यात अमृत भारत कोच, ३२ उच्च-क्षमतेच्या पार्सल व्हॅन आणि ५५ पॅन्ट्री कार देखील तयार केल्या जातील.भारतीय रेल्वेने आपल्या ताफ्यात २,७१० सामान्य डब्यांची वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, यामध्ये नव्या फिचरवाल्या अमृत भारत सामान्य डब्यांचा समावेश सुरू आहे.

## वर्चस्वाच्या लढाईतून गणेश नाईक यांचा मुख्यमंत्र्यांनाच टोला

**मुंबई :** काही शासकीय व सिडकोचे अधिकारी बांधकाम व्यावसायिकांचे दलाल असल्याप्रमाणे वागत आहेत. त्यांच्याकडून मुख्यमंत्र्यांच्या निर्देशाचे पालन केले जात नाही. जर मुख्यमंत्र्यांच्या शब्दाला किंमत नसेल तर तसेच स्पष्ट सांगा. आम्ही लोकांनाही तसे सांगू, अशा शब्दात भारतीय जनता पक्षाचे आमदार गणेश नाईक यांनी अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्र्यांवरच निशाणा साधला.

शाळा, उद्याने, रुग्णालय यासाठी आरक्षित असलेल्या भूखंडांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १३ महिन्यापूर्वीच स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र, बांधकाम व्यावसायिकांचे दलाल असलेल्या अधिकाऱ्यांकडून अशा भूखंडावरील अतिक्रमणांना संरक्षण दिले जात आहे. अतिक्रमण करून बांधण्यात आलेल्या इमारतीला पाणीपुरवठा करावा, अशा इमारतींची स्वच्छता करावी, असे आदेश महापालिकेला दिले जात आहेत. याचा अर्थ मुख्यमंत्र्यांच्या शब्दाला पाच पैशांची किंमत नाही का, असा बोचरा सवाल नाईक यांनी केला आहे.

**नवी मुंबईतील वर्चस्वाची लढाई**


एकेकाळी नवी मुंबईवर गणेश नाईक यांचे एकहाती वर्चस्व होते. नवी मुंबईचे अनभिषिक्त सम्राट असे त्यांचे वर्णन केले जात असे. मात्र, सध्याच्या काळात ते काहीसे बाजूला पडले असे चित्र आहे. शिवसेना शिंदे गट नवी मुंबईत मोठी मुसंडी मारण्याच्या तयारीत आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत गणेश नाईक यांचे पुत्र संजीव नाईक यांना निवडणूक लढविण्याची इच्छा होती. मात्र हा मतदारसंघ शिंदे गटाकडे गेला. ऐरोली भागात शिंदे गटाचे वर्चस्व असून या भागातील सर्वाधिक नगरसेवक शिंदे गटाचे आहेत. मागील काही काळापासून नाईक यांच्या नवी मुंबई महापालिका आणि सिडको मधील वर्चस्वाला धक्का बसला आहे. त्यामुळे गणेश नाईक अस्वस्थ आहे. सत्ताधारी महायुतीचा प्रमुख पक्ष असलेल्या भाजपामध्ये असून देखील ते मुख्यमंत्र्यांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# ५१ उखळी तोफांची सलामी; मराठा आरक्षण संवाद रॅलीचा होणार श्रीगणेशा

**हिंगोली :** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे व सगे सोयरे कायदा अंमलात आणावा, यासाठी मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत मराठा आरक्षण संवाद रॅलीचे (चरीरींहर ठशीर्शीरींळेप ठरश्रश्र) आयोजन केले असून या रॅलीचा ६ जुलै शनिवार रोजी श्रीगणेशा हिंगोलीतून होत आहे. या निमित्ताने मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मागील नऊ महिन्यापासून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी अनेक वेळा आंदोलन केले.

वाहन तळासाठी व्यवस्था:-

सर्वत्र चोख पोलिस बंदोबस्त



मराठा आरक्षण संवाद शांतता रॅलीनिमित्त मराठा योद्धा मनोज जरांगे उद्या हिंगोलीत

या मागणीसाठी शासन चालढकल करीत असल्याने ६ ते १३ जुलै दरम्यान मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत मराठा आरक्षण संवाद रॅली (चरीरींहर ठशीर्शीरींळेप ठरश्रश्र) शांततेच्या मार्गाने काढण्याचा निर्धार मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. त्या निमित्ताने आज ६ जुलै रोजी हिंगोलीत मराठा आरक्षण संवाद रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. त्या निमित्त सकल मराठा समाजाच्यावतीने या रॅली संदर्भात ५ जुलै रोजी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत घेतली. ज्यामध्ये मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे शनिवारी सकाळी १० वाजता हिंगोलीत आगमन होणार असून बळसोंड भागातील शिवनेरी चौकात जेसीबीच्या माध्यमातून पुष्पवृष्टी करून त्यांचे भव्य स्वागत केले जाणार आहे. यानंतर मनोज जरांगे पाटील यांचे छत्रपती शिवाजी महाराज चौकात आगमन होणार असून या ठिकाणी शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन केले जाणार, यावेळी ५१ उखळी तोफांची सलामी दिली जाणार आहे. याच चौकातून ही रॅली काढली जाणार आहे. ज्या-ज्या मार्गावर महापुरूषांचे पुतळे आहेत त्यांना मनोज जरांगे पाटील हे अभिवादन करणार आहेत. ही रॅली शिस्तबद्ध पद्धतीने काढली जाणार असून लाखोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती राहील असा अंदाज सकल मराठा समाजाच्यावतीने पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त करण्यात आला आहे.

### सर्वत्र चोख पोलिस बंदोबस्त

**रॅली निमित्ताने जिल्हा पोलिस अधिक्षक जी. श्रीधर यांनी सर्वत्र चोख पोलिस बंदोबस्त तैनात केला आहे. अप्पर पोलिस अधिक्षक अर्चना पाटील या बंदोबस्त अधिकारी असून त्यांच्यासह ५५ पोलिस कर्मचारी, हिंगोली जिल्हा पोलिस दलातील ४५० कर्मचारी तर लातुरहून १५० पोलिस बंदोबस्तासाठी तैनात केले आहेत. आठ जिल्ह्यात रॅली हिंगोलीत ६ जुलै, परभणीत ७ जुलै, नांदेड ८ जुलै, लातुर ९ जुलै, धाराशिव १० जुलै, बीड ११ जुलै, जालना १२ जुलै व संभाजीनगरात १३ जुलैला मराठा संवाद रॅली काढली जाणार आहे. रॅलीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ही रॅली पोस्टऑफीस, आखरे मेडिकल, खुराणा पेट्रोलपंप, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, म.गांधी चौक येथून इंदिरा गांधी चौकात संवाद साधणार आहेत त्या ठिकाणाहून संवाद यात्रा विसर्जित होईल**

### वाहन तळासाठी व्यवस्था:-

**जवळा पळशी रोड आरके मार्केट परीसर, रेल्वे स्टेशन/मार्केट कमेटी मैदान, अकोला रस्त्यावरील रेल्वे स्थानककडील मैदान, कळमनुरी रस्त्यावरील जि.प.मैदान, एनटीसी परीसर, राजीव सातव सभागृह परीसर, पोलिस कवायत मैदान, लालालजपतरायनगर मैदान, तिरूपतीनगर, आदर्श कॉलेज मैदान, जुने पोलिस अधिक्षक कार्यालयाचे मैदान या परिसरात वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे.**

# माऊलींच्या पालखीचे वाल्हेकरांनी पुष्प वृष्टीने केले स्वागत

**वाल्हे :** ज्या राम नामाने वाल्याचा वाल्मिकी झाला. या महर्षी वाल्मिकीच्या पद स्पर्शाने पावन झालेल्या वाल्हे नगरीमध्ये आज श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दुपारीबारा वाजता पोहोचला. खंडेरायाच्या जेजुरी येथून सकाळी निघालेला पालखी सोहळा सह्याद्रीच्या पर्वतरांगामधून येत असताना, दौंडज खिंडीमध्ये विसवून त्यानंतर दौंडज गावात साडेदहा वाजता पोहोचला.



यावेळी दौंडच गावचे माजी सरपंच जगन्नाथ कदम, सीमाताई भुजबळ, उपसरपंच अनुजा कदम, पोलिस पाटील दिनेश जाधव, विजय फाळके, शरद जाधव, उमेश इंदलकर, माऊली कदम यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी या पालखी सोहळ्याचे स्वागत करून दर्शन घेतले. यानंतर हा पालखी सोहळा वाल्हे गावच्या दिशेने निघाला. दुपारी बारा वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा वाल्हे वेशीवर दाखल झाला. यावेळी ज्ञानोबा तुकाराम, महर्षी वाल्मिकी की जयच्या घोषणा देत वाल्हेकर ग्रामस्थांनी पुष्पृष्टी करत पालखी सोहळ्याचे स्वागत केले. हभप अतुल नाझरे यांनी स्वतः बनवलेला सिंहासनाधीश छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ही माऊलींच्या स्वागतासाठी आणला होता, ते विशेष आकर्षण ठरले.

यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ.दिगंबर दुर्गाडे, वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड, उपसरपंच अमित पवार, माजी सरपंच दत्ता पवार, अमोल खवले, महादेव चव्हाण, माजी सभापती गिरीश पवार, भाजपचे जिल्ह्याचे नेते सचिन लंबाते, वागदरवाडी गावचे सरपंच सुनील पवार, सुकलवाडी गावचे सरपंच संदेश पवार, ग्रामविकास अधिकारी राजाराम शेडगे, तलाठी उमाप भाऊसाहेब, हभप अशोक महाराज पवार, हभप अतुल नाझरे, माजी उपसरपंच पोपट नाना पवार, दिलीप हवलदार, अनिल भुजबळ, प्रा. संतोष नवले, त्रिंबक भुजबळ, गोरख शेठ कदम, अतुल पवार, सचिन देशपांडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. स्वागतानंतर पालखी सोहळापुणेपंढरपूरपालखी मार्गाने सुकलवाडी फाटा येथील पालखी तळाकडे रवाना झाला.भागवत धर्माच्या भगव्या पताका हातात घेऊन टाळ मृदंगाच्या तालावरती ज्ञानोबा-तुकारामचा जयघोष करीत पालखी सोहळा पालखी तळावरती एक वाजता पोहोचला.

त्यानंतर पालखी रथामधून काढून पालखी तळासाठी जागा देणाऱ्या मदने कुटुंबीयांच्या हातामध्ये पालखी दिली गेली. मदने कुटुंबांनी पालखी नाचत-नाचत ओट्याजवळ नेली. चोपदाराच्या इशाऱ्याने पालखी सोहळ्यातील मानाच्या दिंड्या या तंबूच्या बाजूने माऊलींचा जयघोष करत उभ्या होत्या.


चोपदाराच्या इशाऱ्याने दिंड्या एकदम शांत झाल्या. चोपदाराने हरवलेल्या जिनसाची यादी वाचली. सकाळी किती वाजता निघायचे आहे. काही सोहळ्यातील अडीअडचणी प्रशासनाला सांगितल्या. त्यानंतर १:३० मिनिटांनी समाज आरती झाली.श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा उद्या सकाळी साडेसहा वाजता वाल्हे येथून नीरा गावच्या दिशेने जाणार असून, नीरानदीमध्येपवित्र स्नान करून हा पालखी सोहळापुणेजिल्ह्यातून सातारा जिल्ह्यामध्ये प्रवेश करणार आहे. हा सोहळा संध्याकाळी लोणंद येथे मुक्कामी जाणार आहे.

# विधान परिषद निवडणुकीत आमचे तिन्ही उमेदवार निवडून येतील, शंखनाद सभा घेणार : नाना पटोले

**मुंबई :** विधान परिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक होणे अटळ आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी महाविकास आघाडी आणि महायुती यांपैकी कोणीही माघार घेतलेली नाही. विधान परिषद निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतल्याचे समजते. मात्र, त्या प्रयत्नांना यश आले नाही. यानंतर आता विधान परिषद निवडणुकीत आमचे तीनही उमेदवार निवडून येतील, असा दावाकाँग्रेसप्रदेशाध्यक्षनाना पटोलेयांनी केला.

महायुतीकडून भाजपच्या पंकजा मुंडे, योगेशटिळेकर, डॉ. परिणय फुके, अमित गोरखे, सदाभाऊ खोत या पाच जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तर शिंदे गटाकडून भावना गवळी, कृपाल तुमाने यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अजित पवार गटाकडून राजेश विटेकर, शिवाजीराव गर्जे हे विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तसेच महाविकास आघाडीतील काँग्रेसकडून प्रज्ञा सातव, ठाकरे गटाकडून मिलिंद नार्वेकर, शेकाप नेते जयंत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यापैकी कुणीही अर्ज मागे न घेतल्यामुळे आता निवडणूक अटळ असल्याचे सांगितले जात आहे. यावरनाना पटोलेयांनी प्रतिक्रिया दिली.

विधान परिषद निवडणुकीत आमचे तिन्ही उमेदवार निवडून येतील विधानसभा पूर्व तयारीची बैठक आहे. महाविकास आघाडीतील प्रमुख तिन्ही




पक्षातील नेत्यांना बोलावून एक सभा मुंबईत घेणार आहोत. त्याची अजून तारीख ठरलेली नाही. मविआच्या सर्व नेत्यांना बोलवून एक सभा मुंबईत घेणार व तिकडून शंखनाद करणार आहोत. तसेच विधान परिषद निवडणुकीत आमचे तिन्ही उमेदवार निवडून येतील. घोडेबाजार करणारेच घोडेबाजारावर बोलत आहेत. भ्रष्टाचार केला आणि त्याच पैशांनी घोडेबाजार केला, असा आरोप नाना पटोले यांनी केला. तसेच विधानसभेचे जागावाटप लवकरच होईल, असेही ते म्हणाले.दरम्यान, लवकरच मविआ जनतेचे आभार मानण्यासाठी संयुक्त मेळावा घेणार आहे.

तीन पक्षांची प्राथमिक औपचारिक बैठक झाली. विधान परिषदेच्या निवडणुकीसंदर्भात चर्चा झाली. लवकरच संयुक्त मेळावा मविआ घेणार आहे आणि जनतेचे आभार मानणार आहे.

# श्री केदारलिंग देवस्थान मूर्तीचे ७ ते ११ जुलै या कालावधीत संवर्धन

## भाविकांना कासव चौकातून कलश व उत्सवमुर्तींच्या दर्शनाची सोय

**कोल्हापूर :** पन्हाळा तालुक्यातील मौजे वाडी रत्नागिरी येथील श्री केदारलिंग देवस्थान मूर्ती सुस्थितीत राहण्यासाठी सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांच्या वतीने श्री केदारलिंग देवाच्या मूर्तीचे संवर्धन दि. ७ ते ११ जुलै २०२४ या कालावधीत करण्यात येणार असून या कालावधीत भाविकांना मुर्तीचे दर्शन घेता येणार नाही, या कालावधीमध्ये भाविकांना उत्सव मूर्ती व कलश दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. भाविकांनी कासव चौकातून कलश व उत्सवमूर्तीचे दर्शन घेऊन, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीला सहकार्य करावे, असे आवाहन समितीचे सचिव सुशांत बनसोडे यांनी केले आहे.



जिल्हाधिकारी तथा पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीचे प्रशासक अमोल येडगे यांनी मूर्तीची पाहणी करण्यासाठी पुरातत्व विभागास कळविले होते. पुरातत्व विभाग पुणे यांच्याकडून मूर्तीची पाहणी करण्यात आली. मूर्ती सुस्थितीत राहण्यासाठी मूर्तीचे संवर्धन प्रक्रिया करण्याबाबत सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांनी अहवाल दिला असून या नुसार मुर्तीचे संवर्धन करण्यात येणार आहे.

# माऊलींच्या स्वागतासाठी अवघी सजली लोणंदनगरी!

**सातारा :** विठुरायाच्या भेटीची आस मनात घेऊन पंढरीच्या दिशेने निघालेला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा शनिवारी (दि. ६) सातारा जिल्ह्यात दाखल होणार आहे. या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी अवघी लोणंदनगरी सजली असून, जिल्हा प्रशासनदेखील सज्ज झाले आहे.

ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळ्याला परंपरेची किनार आहे. विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वारकरी या सोहळ्यात निस्वार्थ भावनेने सहभागी होत असतात. आनंद अन् भक्तीचा हा अनुपम सोहळा जगाच्या पाठीवर कुठेही दिसत नाही. पंढरीच्या दिशेने निघालेला वैष्णवांचा हा मेळा शनिवारी महर्षी वाल्मिकी यांच्या वाल्हेनगरीचा निरोप घेऊन साताऱ्यात दाखल होणार आहे. लोणंद, तरडगाव, फलटण, बरड असा विसावा घेत हा सोहळा दि. ११ जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. या पालखी सोहळ्यासाठी लोणंदनगरी सज्ज झाली असून, प्रशासनाकडून माउलींच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे.



संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे सातारा जिल्ह्यात स्वागत करण्यासाठी मौजे पाडेगांव येथे स्वागत मंडप उभारण्यात आला आहे. तसेच पालखी विसावा, पालखी तळावरील झाडे-झुडपे काढून परिसर स्वच्छ करण्यात आला आहे.

पालखी महामार्गावरील खड्डे, साईडपटटया तसेच पालखी तळावर मुरुम टाकून वारकऱ्यांची वाट सुकर करण्यात आली आहे. वारकरी व भाविकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा प्रशासनासह पोलिस दलाची यंत्रणा सज्ज झाली आहे. महसूल विभाग, स्वच्छता विभाग, पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग आणि गृह विभागातील एकूण ३ हजार १३२ अधिकारी व कर्मचारी यांची या सोहळ्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

# पोलिसांतील माणसांचे आझाद मैदानात आंदोलन

**मुंबई :** कर्तव्य पार पाडत असताना घर दार सोडून वेळेचे बंधन झुगारून जनतेचे रक्षण करणारे पोलिस अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आझाद मैदानात आंदोलन करत आहेत. आमच्याही काही मागण्या आहेत. त्या जर सरकारने पूर्ण केल्या नाही तर , आगामी विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्ष निर्माण करून सत्तेत राहून मागण्या पूर्ण करून घेऊ. असे माजी पोलिस आयुक्त संजय पांडे यांनी सुराज्य सेवानिवृत्त पोलिस असोशियशन च्या आझाद मैदानातील धरणे आंदोलन वेळी सांगितले.



सेवा निवृत्ती पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांना वैद्यकीय सेवा लागू करावी, पोलिसांच्या आपत्यांस भरतीप्रकिया मध्ये वय मर्यादा ३८ पर्यंत सवलत देऊन एका तरी पोलिस अपत्यास भरती मध्ये प्रथम प्राधान्य देऊन शिपाई या भरती करावे. आश्र्वासित योजनेचा लाभ करून द्यावा. कार्यकारी दलातील पोलिस दलातील पदोन्नती ची जी साखळी आहे ती , पोलिस शिपाई पदावर भारती झालेला झडख या पदावर रिटायर्ड होईल परंतु डढझऋ साठी हा लागू नाही तरी तो निर्णय लागू करण्यात यावा. सेवा निवृत्ती संघटनांना शासनातर्फे मंजुरी देण्यात यावी. पोलिसांवर मारहाण करण्याच्या केसेस साठी तत्काळ तपास होण्यासाठी एका समितीचे गठण करावे त्यात रिटायर्ड जज,रिटायर्ड खझड, तसेच रिटायर्ड आर्मी प्रतिनिधी असावेत. लिपिक कर्मचारी यांचा स्टाफ रद्द करून फक्त त्या आस्थापना मध्ये पोलिस च असावेत . पोलिस आमदार निवडण्यासाठी विधानसभेत प्रतिनिधि ठरवून त्यानुसार चर्चा करून निवडणूक आयोगाकडे त्याबाबत मागणी करावी.असे असोशियशन चे रेल्वे विभाग अध्यक्ष नंदकुमार शेलार यांनी सांगितले.

सुट्यांचा लाभ हा पोलिस अमलदराला महाराष्ट्र सेवेतील इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे दिले जात नाही ,पोलिस हा ७६ दिवसाच्या सुट्ट्या पासून वंचित आहे तर त्यांना त्या दिवसाचे पैसे देण्यात यावे अश्या अनेक मागण्या पूर्ण कराव्यात. आमच्या मागण्या शासनाकडे पाठवत असतो ,परंतु. त्याकडे दुर्लक्ष होत आहे, आमच्या पोलिस कुटुंबाचीकमीत कमी २५/३० लाख मते आहेत तरीही आम्हाला शासनाकडे आमच्या मागण्यांसाठी हाथ जोडावे लागत आहे म्हणून येणाऱ्या निवडणूकीत आम्ही आमचे पोलिसांसाठी प्रतिनिधि उभे करणार आहोत.असे अध्यक्ष मोहन तोडकर व मुकुंद दायमा यांनी सांगितले.

विधानसभा मध्ये पोलिसांच्या मागण्यासाठी कमीत कमी महाराष्ट्रातून ५ आमदार आम्ही आमदार उभे करू असे संजय पांडे यांनी सांगितले. पोलिसांवर हल्ले होत असतात, तो हल्ला म्हणजे शासनावर हल्ला गृहीत धरून शासन द्रोही म्हणून कारवाई करावी. त्यासाठी कायद्यात पहिल्यापासून तरतूद आहे, नवीन कायदे करण्याची गरज नाही. मानवी हक्क आयोगाने पोलिसांकडे कधीच व्यवस्थित लक्ष दिले नसल्याचा आरोप त्यांनी केला.

पोलिसांवरील मारहाण प्रकरणी पोलीस न्यायव्यवस्था महामंडळ स्थापन करण्यात यावे असे पांडे यांनी सांगितले. आमची जी संघटना आहे ती कार्यरत पोलिस आणि सेवानिवृत्त पोलिस यांच्या समस्या सोडवण्यासाठी आहे,आणि त्यासाठीच आम्ही राजकीय पक्ष काढणार असल्याचे संजय पांडे यांनी सांगितले.

# १२ जुलैला होणार सर्वत्र प्रदर्शित

## रांगडामध्ये अनुभवता येणार कुस्ती आणि बैलगाडा शर्यतीचा थरार

**मुंबई :** महाराष्ट्राच्या मातीतली अस्सल कुस्ती, बैलगाडा शर्यत केंद्रस्थानी असलेल्या रांगडा या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला. प्रेमकथा, राजकारण, ॲक्शन असलेल्या या चित्रपटाविषयी प्रचंड उत्सुकता असून, १२ जुलैला हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

शेतकरी पुत्र प्रॉडक्शन या निर्मिती संस्थेच्या माध्यमातून योगेश बालवडकर, किरण फाटे,राहुल गव्हाणे, मच्छिन्द्र लंके, अब्बास मुजावर, आयुब हवालदार यांनी रांगडा या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाच्या निर्मितीसह कथा आणि दिग्दर्शन अशी कामगिरी आयुब हवालदार यांनी केली असून बाबाजी सातपुते आणि युवराज पठारे यांनी सहनिर्मिती केली आहे. संवादलेखक म्हणून दीपक ठुबे यांनी काम पाहिले आहे. अजित मांदळे, नौशाद इनामदार यांनी संकलन तर अन्सार खान यांनी छायाचित्रण केले आहे. अरुण वाळूंज, प्रमोद अंबाडकर यांनी लिहिलेल्या गीतांना रोहित नागभिडे यांचे सुमधुर संगीत लाभले आहे. भूषण शिवतारे, मयुरी नव्हाते, अमोल लंके, भीमराज धनापुणे,अतिक मुजावर, संदीप (बापु)रासकर,राजेंद्र गुंजाळ, पल्लवी चव्हाण, निकिता पेठकर, निलेश कवाद या कलाकारांच्या दमदार प्रमुख भूमिका आपल्याला चित्रपटात पहायला मिळणार आहेत. विशेष म्हणजे, दोन राष्ट्रीय कुस्तीपटू चित्रपटातील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

सर्वसामान्य कुटुंबातील तरुणाला कुस्ती आणि बैलगाडा शर्यतीचा असलेला छंद, त्यासाठी त्याला करावा लागणारा संघर्ष हे रांगडा चित्रपटाचं मुख्य कथासूत्र आहे. त्याशिवाय तगडे, बलदंड नायक, खलनायक, देखणी नायिका असल्यानं प्रेमकथा, राजकारण, तुफान ॲक्शनचा धडाकेबाज तडका या चित्रपटात आहे. ग्रामीण पार्श्वभूमीवरचं कथानक आजवर अनेक चित्रपटांमधून रुपेरी पडद्यावर आलं असलं, तरी त्यात रांगडा हा चित्रपट नक्कीच वेगळा ठरणार आहे. या चित्रपटाच्या सकस कथानकाची मांडणी तांत्रिकदृष्ट्या तितक्याच उत्तम पद्धतीनं करण्यात आल्याचं ट्रेलरवरून दिसून येतं. म्हणून आता केवळ १२ जुलैपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यानंतर मोठ्या पडद्यावर रांगडेपणाचा अस्सल अनुभव प्रेक्षकांना घेता येणार आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

## क्राईम

### सोन्याची अंगठी लांबवल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** सातारा रहिमतपूर रोडवर दोन अनोळखी इसमानी हातचलाखी करून एका वृद्धाची पंधरा हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी लांबवली. याप्रकरणी श्रीपतराव तुकाराम पाटील वय ७७ राहणार समर्थ नगर एमआयडीसी सातारा यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दिनांक ३ जुलै रोजी सायंकाळी पावणे सहाच्या दरम्यान फिर्यादी पाटील घराच्या दिशेने जात असताना विजयनगर कॉर्नर येथे दोन अनोळखी इसमानी मोटरसायकलवर येऊन त्यांना पत्ता विचारण्याचा बहाणा केला आणि हातलाखीने त्यांची हातातली सोन्याची अंगठी गायब केली . पोलीस कॉन्स्टेबल वाघ अधिक तपास करत आहे.

### पोलीस असल्याची बतावणी करून दुचाकी लांबवली

सातारा : पोलीस असल्याचा बहाना करून दुचाकी लांबवल्याप्रकरणी निखिल पाटील याच्यावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे याप्रकरणी सुषमा चंद्रकांत गाडगे वय ३६ राहणार खिंडवाडी तालुका सातारा यांनी ही फिर्याद दिली आहे.

दिनांक ७ जून रोजी सकाळी साडेनऊच्या दरम्यान चहाच्या टपरीत येऊन संबंधित आरोपी निखिल पाटील यांनी मी पोलीस खात्यात काम करतो असे सांगून सातारा पॉलीटेक्निक कॉलेज सातारा येथे मित्राला भेटायला जायचे आहे तुमची मला जुपिटर गाडी द्या मी लगेच जाऊन येतो असे सांगितले आणि फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्याने गाडी परत माघारी दिली नाही . पोलीस हवालदार निकम आणि तपास करत आहेत.

### सोन्याची अंगठी लांबवल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

सातारा : सातारा रहिमतपूर रोडवर दोन अनोळखी इसमानी हातचलाखी करून एका वृद्धाची पंधरा हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी लांबवली . याप्रकरणी श्रीपतराव तुकाराम पाटील वय ७७ राहणार समर्थ नगर एमआयडीसी सातारा यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे

### शाहूपुरी पोलिसांकडून गहाळ झालेले २८ मोबाईल हस्तगत

**साडेसहा लाखाचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात**

**सातारा :** शाहूपुरी पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी चिकाटीने तपास करून महाराष्ट्रासह इतर राज्यातील नागरिकांचे गहाळ मोबाईल परत मिळवले आहेत. एकूण २८ मोबाईल शाहूपुरी शाखेच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने हस्तगत केले आहेत. एकूण मुद्देमाल साडेसहा लाख रुपयांचा आहे याबाबतची माहिती शाहूपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र सावंत्रे यांनी दिली आहे.

पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी शाहूपुरी पोलिसांना वाढत्या मोबाईल चोरीच्या घटनेच्या संदर्भात तपास करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या तांत्रिक पथकाचे एम बी बनकर यांनी सीईआर व इतर तांत्रिक विश्लेषणाद्वारे इतर राज्यातील मोबाईल मिळालेल्या लोकांशी नियमित संपर्क करून तपास मोहीम राबवली .शाहूपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागरिकांचे गाळ झालेले साडेसहा लाख रुपये किमतीचे २८ मोबाईल हस्तगत करण्यात यश आले आहे. सदरची मोहीम पोलीस अधीक्षक समीर शेख वापर पोलीस अधीक्षक अचल दलाल उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आली. हे प्राप्त मोबाइल मूळ मालकांना देण्यात आले आहेत.

या तपास मोहिमेमध्ये पोलीस अधिकारी कुमार ढेरे, पोलीस अंमलदार सुरेश घोडके, मनोज मदने, निलेश काटकर, ज्योतीराम पवार, महेश बनकर, अभय साबळे, सचिन पवार,स्वप्निल सावंत, स्वप्निल पवार, सुमित मोरे, संग्राम फडतरे, महेश पवार, प्रशांत मोरे यांनी भाग घेतला होता.

### हनुमानवाडीत एकावर चाकूने वार

**उंब्रज ;** हनुमानवाडी ता.कराड गावचे हद्दीत दीपक किसन हत्ते वय ४२ यांचेवर दोघात चालू केलेला वडापावचा गाडा का बंद केला या कारणासाठी जगन्नाथ राजेंद्र जाधव रा.तळबीड याने चाकूने वार केल्याची घटना बुधवार दि.३ रोजी सायंकाळी सात वाजनेच्या सुमारास घडली आहे.याबाबतची फिर्याद दिपक किसन हत्ते वय-४२ वर्षे रा. हनुमानवाडी ता. कराड यांनी उंब्रज पोलीस ठाण्यात दिली आहे.

संशयित आरोपी जगन्नाथ राजेंद्र जाधव रा.तळबीड याच्यावर उंब्रज पोलिसात गुन्हा नोंद झाला असून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

याबाबत उंब्रज पोलिसांनी दिलेली माहिती अशी की बुधवार दि.३ जुलै रोजी सायं.७ वा.चे सुमारास मौजे हनुमानवाडी ता. कराड गावचे हद्दीत फिर्यादी दीपक हत्ते राहते घरात वरच्या मजल्यावर टीव्ही बघत बसले असताना जगन्नाथ राजेंद्र जाधव रा. तळबीड ता. कराड याने वरचे गॅलरीतुन आत घरातील हॉल मध्ये प्रवेश करून दोघांत चालु केलेला वडापावचा गाडा बंद केल्याचा राग मनात धरून फिर्यादी यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने त्याने सोबत आणलेल्या चाकुने फिर्यादीच्या डावे दंडाजवळ, डोकीत, पाठीवर घोपसुन व वार करून गंभीर दुखापत केली फिर्यादीला सोडविण्यास आलेला पुतण्या संकेत दशरथ हत्ते यालाही डावे दंडाजवळ व उजवे मनगटावर चाकुने वार करून गंभीर दुखापत केली तसेच पळुन जाताना वडिल किसन सिताराम हत्ते यांना ढकलुन देवुन त्यांचे पायास दुखापत केली आहे.याबाबत उंब्रज पोलिसात गुन्हा दाखल झाला असून संशयित आरोपीस शिताफीने ताब्यात घेण्यात आले आहे अधिक तपास स.पो.नि रविंद्र भोरे प्रभारी अधिकारी उंब्रज पोलीस ठाणे हे करीत आहेत.

### पूर्व वैमन्यातून खून; आरोपींना ९ जुलै पर्यंत पोलीस कोठडी



**कोल्हापूर :** पूर्व वैमनस्यातून पंकज भोसले याचा राजारामपुरी परिसरात दगडानं ठेचून खून केल्याप्रकरणी पोलिसांनी आज दोघांना अटक केलीय . मंगळवारी ताब्यात घेतलेल्या केलेल्या दोघांपैकी निलेश काटे याला झटापटीवेळी गंभीर दुखापत झाल्यान,उपचारासाठी त्याला सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आलय . मंगळवारी अटक केलेला गणेश काटे याच्यासह आज अटक केलेले उमेश काटे आणि अमित गायकवाड या तिघांना न्यायालयानं ९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# माऊलींच्या स्वागतासाठी लोणंदनगरी सज्ज

## नगरपंचायतीसह सर्व विभागांची जय्यत तयारी



**लोणंद :** लोणंद येथे येत्या शनिवारपासून येत असलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दि. सहा ते आठ दरम्यान नगरपंचायत लोणंद, महसूल विभाग, ग्रामविकास विभाग, महावितरण विभाग, आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन या विभागांमार्फत पालखी सोहळा सुरक्षीत पार पाडण्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे.

लोणंद नगरपंचायतीच्या वतीने पालखी तळावर मुरमीकरण व कच टाकून संपूर्ण तळ सुस्थितीत करणेत आला असून खेमावती नदी संपूर्ण स्वच्छ करण्यात आली आहे तसेच उपविभागीय अधिकारी व खंडाळा तहसिलदार यांच्या सूचना व आदेशानुसार नगरपंचायतीच्या वतीने जेसीबी, फरांडी ट्रॅक्टर, रोड रोलर यांच्या सहाय्याने रहदारीच्या रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे व झाडे काढून मुरुम टाकून सपाटीकरण करणेत आले आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याकरीता बाजारतळ येथील धोबीघाटाची संपूर्ण दुरुस्ती व स्वच्छता करणेत आली आहे; तसेच महिलांसाठी नवीन स्नानगृह बांधण्यात आले आहे . संपूर्ण तळावर फ्लड लाईट, डेकोरेशन त्याच प्रमाणे विश्वस्तांच्ये सल्ल्यानुसार दर्शन रांगा व उन्हाची तिव्रता लक्षात घेवून दर्शन रांगेवरती सावली करण्यात येत असून दर्शन रांगेत पाय भाजू नयेत म्हणून मॅट टाकण्यात येत आहे. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठीच्या सार्वजनिक शौचालयांसाठी १४ ठिकाणी नियोजन करून त्या ठिकाणी स्वच्छता व विद्युत कनेक्शनची सोय करण्यात आली आहे. तसेच पालखी सोहळ्यानिमित्ताने येणाऱ्या सर्व दिंड्यांच्या विसाव्याच्या ठिकाणी जेसीबी व ट्रॅक्टरच्या सहाय्याने साफसफाई, स्वच्छता करण्यात आली आहे. तसेच डासांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून फॉगिंग मशिनव्दारे धूर फवारणी करण्यात आली आहे. आवश्यक ठिकाणी पोहच रस्त्यावर देखील मुरुम टाकण्यात आला आहे अशी माहीती लोणंद नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सीमा वैभव खरात व उपनगराध्यक्ष रवींद्र क्षीरसागर तसेच मुख्याधिकारी दत्तात्रय गायकवाड यांनी दिली.

पालखी सोहळ्यासाठी पाणीपुरवठा अंतर्गत सर्व पाणीपुरवठा टाक्यांचे निर्जतुकीकरण करणेत आले आहे. गांवठाण आर.सी.सी. उंच टाक्या-४, जांभळीचा मळा ,बेलाचा मळा , जलशुध्दीकरण केंद्र, पाडेगांव सर्व टैंक मशीनद्वारे सफाई करुन निर्जतुकीकरण करणेत आले आहे. तसेच सर्व योजना यामध्ये पाडेगांव पंपींग मशीनरी, इले. मोटर्स, इंदिरानगर , वेअर हाऊस ,दगड वस्ती, बेलाचा मळा येथील सर्व इलेक्ट्रिक मोटर्सची तसेच सर्व पाणीपुरवठा योजनांचे व्हॉल्व दुरुस्त करणेत आले असून चेंबर बांधकाम करणेत आले आहे. पाणी पुरवठा योजनेसाठी आवश्यक ती सर्व सामुग्री, खरेदी करणेत आली आहे. तसेच पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक टि.सी.एल. व तुरटी खरेदी करणेत आली आहे. पालखी मुक्काम अडीच दिवस असल्याने शौचालयाच्या ठीकाणी पुरेस्या पाण्याची व्यवस्था तसेच पाणी टैंकर वेळेत, आवश्यक ठिकाणी पोहचतील याचे नियोजन करण्यात आले आहे.

आरोग्य विभागाने गांवठाण अंतर्गत असलेली सर्व सार्वजनिक शौचालये दुरुस्ती केली आहेत. त्याचप्रमाणे गांवठाणमधील सर्व गटारांची सफाई नियमितपणे केली जात असून गटारालगतचे गवत काढणेत आले आहे. पालखी काळात गटारावर डी.डी. टी. पावडर टाकणेसाठी पावडर साठा उपलब्ध करून ठेवणेत आला आहे.मुतारी सफाई करणेसाठी फिनेल, डांबर गोळ्या खरेदी करणेत आले आहेत.

नगरपंचायतीच्या वतीने पालखी तळावर सुलभ शौचालय उभारण्यात आले आहे. लोणंद गांवठाण व वाड्या-वस्त्यांवरील रोडलाईट्सची दुरुस्ती करणेत आली असून गांवठाणमध्ये सर्व महत्वाचे चौकात कायमस्वरुपी फ्लड लाईट्स (हायमास्ट) व्यवस्था करणेत आलेली असून गांवठाणसह वाडीवस्त्यावरील दिवे दुरुस्त केलेले आहेत.

सार्वजनिक स्वच्छतेअंतर्गत गांवठाणमधील सर्व रस्त्याकडेची काटेरी झाडे काढणेत आली आहेत. खुल्या जागेतील स्वच्छता ट्रॅक्टरच्या सहाय्याने करण्यात आली असून रस्त्यावरील खड्डे मुरुम टाकून भरण्यात आले आहेत. याशिवाय माऊलीचे पालखी तळावर मदत केंद्र, आरोग्य विभाग, दवाखाना, पोलिस मदत केंद्र, अग्निशमन सेवा या सर्व अत्यावश्यक बाबींचे नियोजन करण्यात आले आहे. वारकरी स्नानासाठी पालखी तळावर स्नानगृह सुविधा उपलब्ध करणेत आले आहे. लोणंद पालखी तळावर पालखी आगमनापुर्वी निरा येथे पालखी सोहळा आल्यापासून पालखी सोहळा तरडगाव येथून पुढे जाईपर्यंत दि.०६,०७ व ०८ जूलै २०२४ अखेर दिंड्यांचे टँकर भरण्यासाठी नगरपंचायत विविध ठिकाणी तात्पुरती वॉटर फीडींग पाँईटस् करण्यात आले आहेत. तसेच पालखीतळ व शास्त्रीचौक येथे एल.इ.डी. स्क्रीन प्रत्यक्ष दर्शनासाठी लावण्यात आल्या आहेत. नगरपंचायत लोणंद मार्फत माऊलींच्या स्वागताचे नियोजन नगरपंचायत समोर सालाबादप्रमाणे करणेत येणार आहे अशी माहीती देण्यात आली आहे.

यावेळेस लोणंद नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सीमा वैभव खरात, उपनगराध्यक्ष रवींद्र क्षीरसागर, नगरसेवक शिवाजीराव शेळके-पाटील, गणीभाई कच्छी, भरत शेळके-पाटील,भरत बोडरे, सागर शेळके, नगरसेविका तृप्ती राहुल घाडगे, ज्योती डोणीकर, रशीदा इनामदार, सुप्रिया शेळके, मधुमती पलंगे तसेच असगर इनामदार, बंटी खरात, गणेश शेळके, मुख्याधीकारी दत्तात्रय गायकवाड, सागर मोटे, कार्यालयीन अधीक्षक शंकर शेळके, विजय बनकर, बाळकृष्ण भिसे आदी मान्यवर उपस्थित होते.

## लोक जनशक्ती पार्टी (रामविलास) च्या वतीने रामविलास पासवान यांची ७८ वी जयंती साजरी

पुणे : लोक जनशक्ती पार्टी (रामविलास) पुणे शहर-जिल्ह्याच्या वतीने आज साधू वासवानी चौकातील पक्ष कार्यालयात पक्षाचे संस्थापक पद्मभूषण दिवंगत रामविलास पासवान यांची ७८ वी जयंती साजरी करण्यात आली.पासवान यांच्या प्रतिमेला यावेळी पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी पुणे शहर-जिल्हाध्यक्ष संजय आल्हाट,अमर पुणेकर,के. सी.पवार,एडवोकेट अमित दरेकर,रोहित जसवंते,विजय अठवाल,कैलास पिंगळे,जॉन्सन कोल्हापुरे,अनिल मुळवणे,सागर जगताप, माया पंडित,अनुश्री यादव,यमुना साळवे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

'रामविलास पासवान यांच्या संकल्पनेतील योजना आणि उपक्रम सामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे आणि निवडणुकांमध्ये त्यांच्या विचाराचे कार्यकर्ते सत्तेत लोकसेवेसाठी पोहोचविणे,हीच आदरांजली ठरेल.त्यासाठी सर्वानी कटिबद्ध व्हावे',असे प्रतिपादन संजय आल्हाट यांनी यावेळी बोलताना केले.

## शिवसेनेकडून अंबादास दानवे यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन



**कोल्हापूर :** विधिमंडळाच्या परंपरेला गालबोट लावून सार्वभौम सभागृहात शिवीगाळ करणाऱ्या विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा निषेध करत दानवे यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन करण्यात आले. अंबादास दानवे कोण रे पायताण मारा दोन रे, राजीनामा द्या.. राजीनामा द्या.. अशा घोषणा देत शिवसैनिकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर दणाणून सोडला.

शिवसेना जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण म्हणाले, विधिमंडळात जो प्रकार घडला तो अतिशय क्लेशदारी होता. महिला उपसभापती, महिला लोकप्रतिनिधी असताना शिवीगाळ करणे हि महाराष्ट्राची संस्कुती नाही आणि शिवसेनाप्रमुखांची शिकवणही नाही. यामुळे विधिमंडळाचा अवमान झालाच पण अशा प्रकरणामुळे महिला लोकप्रतिनिधी काम करणं अवघड होईल. विरोधी पक्षनेत्या कडून अशा प्रकारची घटना घडणे यावरून राज्यात कुठल्या प्रकारची ही संस्कृती रुजवली जात आहे? याचा त्यांच्या नेत्यांनीदेखील विचार केला पाहिजे.

यावेळी महानगरप्रमुख शिवाजी जाधव, शहरप्रमुख रणजीत जाधव, महिला आघाडी शहरप्रमुख पवित्रा रांगणेकर, समन्वयक पूजा भोर, शिव उद्योग सहकार सेना शहरप्रमुख मंगलताई कुलकर्णी, पूजा कामते, शिवसेना उपजिल्हाप्रमुख रमेश खाडे, तुकाराम साळोखे, उदय भोसले, किशोर घाडगे, ॲड.अमोल माने, दीपक चव्हाण, अनुसूचित जाती जमाती सेना जिल्हाप्रमुख निलेश हंकारे, शहरप्रमुख प्रभू गायकवाड, रिक्षा सेना शहरप्रमुख राजू पोवार, युवासेना शहरप्रमुख पियुष चव्हाण, शहर समन्वयक शैलेश साळोखे, शिवसेना उपशहरप्रमुख कपिल नाळे, सुरेश माने, प्रदीप मोहिते, अवधूत घाटगे, किरण पाटील, अंकुश निपाणीकर, श्रीकांत मंडलिक, कपिल सरनाईक, आकाश झेंडे, मुकुंद सावंत उपस्थित होते.

## गांजाची विक्री आणि साठा करणाऱ्या तिघांना अटक

कोल्हापूर : गांजाची विक्री आणि साठा करणाऱ्या तिघांना लक्ष्मीपुरी पोलिसांनी आज अटक केलीय . अमित चौगले, विनायक पाटील आणि सचिन बेडेकर अशी त्यांची नावं असून, त्यांच्याकडून १ किलो ४५० ग्रॅम गांजा आणि अन्य साहित्य असा सुमारे १ लाख ७२ हजार ८५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे .

कोल्हापूर लक्षतीर्थ वसाहत इथल्या एका अपार्टमेंटच्या पुढील बाजूला असणाऱ्या मोकळ्या जागेत काही तरुण गांजाची विक्री करत असल्याची माहिती, लक्ष्मीपुरी पोलिसांना मिळाली होती . त्यानुसार आज सायंकाळी पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकून गांजाची विक्री करणाऱ्या चंबूखडी इथल्या गणेश नगरमध्ये राहणाऱ्या अमित शंकर चौगले, विनायक प्रताप पाटील आणि सचिन महादेव बेडेकर या तिघांना अटक केली . त्यांच्याकड अधिक चौकशी केली असता, त्यांनी अमित चौगले याच्या घरामध्ये गांजाचा साठा केल्याची माहिती पोलिसांना दिली . त्यानुसार पोलिसांनी याठिकाणी छापा टाकून १ किलो ४५० ग्रॅम वजनाचा गांजा, २ मोटरसायकली आणि ३ मोबाईल हँडसेट असा १ लाख ७२ हजार ८५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे . पोलीस निरीक्षक दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल जाधव, मंगेश माने, तानाजी दावणे, किशोर पवार, देवानंद बल्लारी, अमित पाटील आणि अतुल पाटील यांनी या कारवाईत सहभाग घेतला होता .

## भारतरत्न डॉ. बी.आर. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने एमआयटी डब्ल्यूपीयुचे अरूण शिंदे यांचा सन्मान



**पुणे :** शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे सहाय्यक कुलसचिव अरूण हनुमंतराव शिंदे यांना नुकताच भारतरत्न डॉ. बी.आर.आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार २०२४ ने गौरविन्यात आले. त्यांना हा पुरस्कार भारतीय स्वयंसेवी महासंघातर्फे प्रदान करण्यात आला. स्मृती चिन्ह व सन्मान पत्र हे पुरस्काराचे स्वरूप होते.

दिल्ली येथील महाराष्ट्र सदन मध्ये आयोजित कार्यक्रमात अरूण शिंदे यांना हा पुरस्कार खासदार धैर्यशील मोहिते पाटील, भाऊसाहेब वाकचौर आणि नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एस.एन.पठाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. खासदार रामदास आठवले यांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी भारतीय स्वयं सेवी संस्था महासंघाचे अध्यक्ष प्रा. गोरख साठे यांच्या बरोबर शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिवावर बेतणारे सेल्फी,फोटोसेशनचा स्टंट, डीपी,स्टेटस् आणि रिल्सचे तरुणाईला वेड

**पन्हाळ्यासह परिसरात धोकादायक प्रकार वाढले**

**पन्हाळा :** दोन आठवड्या पुर्वी पन्हाळगडावरील उंच कड्यावरुन एका तरुणाचा सेल्फी घेताना पायघसरुन खाली पडल्याची घटना समोर आली.सैदुवाने हा तरुण बचावला असला तरी त्याला गंभीर दुखापत झाली आहे.त्यामुळे सेल्फीचा मोह या तरुणाला महागात पडला त्याला जीवाला मुकण्याची वेळ आली होती. पन्हाळगडावरील तटबंदी, कड्यालगत उभे राहुन जीव धोक्यात घालत फोटोसेशन, सेल्फी करण्याची स्टंटबाजी जीवघेणी ठरत आहेत.



**पन्हाळ्यातील तटबंदीच्या कड्यावर जीवाची परवा नकरता तरुणाई कडुन फोटोसेशन व सेल्फी घेतली जाते.**

उन्हाळा,हिवाळा व पावसाळा पन्हाळ्यातील वातावरण आल्हाददायक असते.यामुळे पन्हाळगडावर कायमच पर्यटकांची गर्दी आसते. पर्यटकांची पन्हाळ्याला शनिवार व रविवार सुट्टीच्या दिवशी तर पर्यटकांची रीघ गडाकडे येताना नजरेस पडते. निसर्गाच्या सानिध्यात जात असताना त्याचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी प्रत्येकजण आतुरलेला असतो.मात्र या ठिकाणी आवश्यक ती खबरदारी न घेतल्याने जीवावर बेतणारे प्रसंगही येवु लागले आहेत. त्यामुळे भान हरपुन निसर्ग कॅमेऱ्यात कैद करण्याच्या नादात अनेकांना जीवाला मुकण्याची वेळ आल्यावरच शहाणपणा येणार काय,असा प्रश्न पन्हाळ्यात स्टंटबाजी करणाऱ्यांबाबत पडत आहे.

विविध पर्यटन स्थळांच्या ठिकाणी स्टंटबाजी केल्याने अनेक युवकांना आपले प्राण गमवावे लागल्याची घटना समोर येत आहे. आशा घटना वारंवार पन्हाळ्यावर होत आहेत. सध्या पावसाळ्याला सुरुवात झाली आहे.त्यामुळे येथील घनदाट धुके,थंडगार वारा आणि पावसाचा आस्वाद घेण्यासाठी तरुणाईचे घोळके येत असल्याचे दिसुन येत आहेत.

धुक्यासोबत येथील निसर्गसौदर्यांचा अविष्कार कॅमऱ्यात कैद करुन व्हॉटसप,फेसबुकवर,डिस्पले पिक्चर,प्रोफाईल पिक्चरसाठी धोकादायक ठिकाणी बेभान होऊन थ्रील करत सेल्फी करण्यात हे तरुण मग्न होत आहेत. प्रत्येक तरुणाईला आपल्या डीपीवरील पिक्चरचे इतरांकडुन कौतुक व्हावेसे वाटत आहे. डीपी सर्वापेक्षा वेगळा कसा असेल. ?यासाठी फोटोसेशन करताना जीवावरचा धोका पत्करत असतानाचे पन्हाळ्याच्या तटबंदीवर सर्रास दृश्य नजरेस पडते.अनेक विविध पोझ देऊन सेल्फी,फोटोसेशन करण्यासाठी अधिक कल दिसतो.अंधारबाव ते तीनदरवाजा दरम्यान असलेल्या कठड्यावर उभे राहुन, धोकादायक खोली असणाऱ्या व कसलाही आधार नसणाऱ्या उंच कड्यावर तरुणाई आपल्या मित्रासमवेत सेल्फी,फोटोसेशन करताना बेभान हाऊन आपण सुरक्षित आहोत की नाही,याचे जराही भान तरुणाईला राहत नाही.अशीच परिस्थिती इदगाह मैदान,पुसाटी बुरुज,दुतोंडी बुरुज,वारे बुरुज,कलावंतीण महल परिसरातील तटबंदीच्या कड्यावर पहायवाय मिळत आहे.

निसर्गात जाताना आपल्यासोबत गरजेच्या,सुरक्षेच्या आवश्यक वस्तु घेण्याचा विचार बहुतांश पर्यटक करीत नाहीत.बाहेर जायचं म्हटलं की मोबाईल चार्ज करणे आणि पॉवरबँक सोबत असणे याला सर्वाधिक पसंती दिली जाते. निसर्गात गेल्यानंतर त्याचा आनंद उघड्या डोळ्यांनी घेण्यापेक्षा तो कॅमेऱ्यात कैद करण्याकडेच अनेकाचा कल असतो.परफेक्ट पिक्चर घेण्याच्या नादात वाटेल ते धाडस करण्याची पर्यटकांची मानसिकता असते.त्यामुळे निसर्ग कॅमेऱ्यात कैद करताना स्टंटबाजीमुळे दवाखान्याची पायरी चढु नका असे आवाहन, पन्हाळा पोलीस निरीक्षक महेश इंगळे,व नगरपरिषद मुख्याधिकारी चेतन कुमार माळी यांनी केले आहे.

पन्हाळ्यासह परिसरातील मसाईपठार येथे पर्यटकांची गर्दी असते.येथील तटबंदीवर दरीच्या बाजुने सेल्फी,फोटोसेशन करणे धोकादायक असुन संरक्षणासाठी तेथे कठडे नाहीत, पावसामुळे प्रचंड निसरडे झाले आहे पण पर्यटक कोणतिही काळजी घेत नाहीत. याठिकाणी लोकवस्ती नसल्याने अपघात की घातपात असाच समज होणार आहे त्यामुळे स्टंटबाजी करताना पर्यटकांनीच आता शहाणे होणे गरजेचे आहे.

# महाराणी येसूबाईंची कर्तुत्वगाथा इतिहासात आजही उपेक्षित : राजेंद्र घाडगे

**सातारा :** स्वराज्याच्या कुलमुखत्यार महाराणी येसूबाई यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या वीरमरणानंतर जो मुत्सद्दीपणा दाखवला त्याला इतिहासात तोड नाही. छत्रपती राजाराम महाराज यांना जिंजीला पाठवण्यामध्ये येसूबाईंचा मोठा वाटा होता. त्यांच्या या मुत्सद्देगिरीमुळे मुघल सम्राट औरंगजेबाला कधी स्वराज्य जिंकता आले नाही मात्र येसूबाईंच्या कर्तुत्व गाथेवर इतिहासाने म्हणावा तसा प्रकाश टाकला नाही अशी खंत ज्येष्ठ इतिहास संशोधक राजेंद्र घाडगे यांनी व्यक्त केली.

महाराणी येसूबाई यांनी ४ जुलै १७१९ रोजी औरंगजेबाच्या कैदेतून सुटल्यानंतर साताऱ्यात आगमन केले होते. हा दिवस येसूबाईंच्या आगमनाचा शौर्यदिन पाळला जातो या निमित्ताने संगम माहुली येथील येसूबाईंच्या समाधी परिसरामध्ये अभिवादन कार्यक्रम आणि त्यांच्या वरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते .हा उपक्रम येसूबाई फाउंडेशनचे अध्यक्ष सुहास राजेशिर्के व जिज्ञासा मंचचे निलेश पंडित यांच्या पुढाकाराने राबवण्यात येतो यावेळी माहुली येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत आयोजित व्याख्यान पर कार्यक्रमात ते बोलत होते.

घाडगे पुढे म्हणाले येसूबाई या छत्रपती संभाजी महाराजांच्या केवळ पत्नीच नव्हत्या तर स्वराज्याच्या कुलमुखत्यार होत्या. ध्येयवादीपणा आणि राजकीय धुरंदरपणा हा त्यांच्यातील अंगभूत गुण होता. छत्रपती शिवरायांच्या आणि महाराणी जिजाऊ महाराजांच्या छायेमध्ये वावरत असताना त्यांनी स्वराज्याविषयीची निष्ठा आणि संतुलित व्यक्तिमत्त्वाचे सत्व अंगी बाणवले. छत्रपती संभाजी महाराजांच्या वीर मरणानंतर स्वराज्याचा पुढील छत्रपती घडण्यासाठी त्यांनी राजाराम महाराजांना जिंजीला पाठवले इतिहासामध्ये त्यांनी घेतलेला हा धोरणात्मक निर्णय अतिशय महत्त्वाचा ठरला त्यानंतर मराठ्यांनी २५ वर्ष मुघल सम्राट औरंगाबाद ठेवले स्वराज्याच्या जडणघडणीमध्ये येसूबाई यांचे मोठे योगदान आहे औरंगजेबासारख्या मोगल सम्राटाच्या कैदीमध्ये २९ वर्ष काढणे ही त्यांच्या सत्वगुणांची परीक्षाच होती मात्र येसूबाईंनी अत्यंत संयमाने ही परिस्थिती हाताळत हेही संकट निभावले त्यांच्या या कार्यकर्तृत्वावर इतिहास आणि म्हणावा तसा प्रकाश टाकलेला नाही महाराणी येसूबाईंनी स्वराज्यासाठी केलेला हा त्या आजच्या पिढीला म्हणावा तसा माहित नाही .याशिवाय मृत्यूच्या तिथी विषयी सुद्धा इतिहासामध्ये संभ्रमावस्था आहे अत्यंत थोर कारकीर्द घडलेल्या येसूबाईंच्या जीवनाविषयी इतिहासामध्ये अत्यंत तुटपुंची माहिती उपलब्ध व्हावी हे दुर्दैवी आहे त्यांची कर्तुत्व गाथा आणि त्यापासून आजच्या पिढीला प्रेरणा मिळण्यासाठी असे शौर्य दिन दरवर्षी साजरे केले केले पाहिजे यासाठी येसूबाई फाउंडेशन आणि जिज्ञासा मंच यांचे करावे इतके कौतुक थोडे आहे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे स्वागत येसूबाई फाउंडेशनच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सुरुवातीला उपस्थितांनी येसूबाईंच्या समाधीला अभिवादन केले निलेश पंडित व सुहास राजेशिर्के, मुख्याध्यापक एस पी काटकर यांनी स्वागत केले .आजचा कार्यक्रम अत्यंत स्तुत्य बोधप्रद असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली. यावेळी कार्यक्रमास माहुली गावचे उपसरपंच अविनाश कोळपे

## महाराणी येसूबाई यांचा आगमन शौर्य दिनं उत्साहात साजरा



# सीपीआरला एमआरआय मशीनसाठी २६ कोटीचे अनुदान मंजूर

## पालकमंत्री हसन मुश्रीफ यांची माहिती

**कोल्हापूर :** सीपीआर रुग्णालयासाठी एमआरआय मशिनरीसह अन्य आनुषंगिक कामांसाठी २६ कोटी रुपये मंजूर झाल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. या नव्या मशिनरीमुळे दर महिन्याला १२५ ते १५० रुग्णांच्या कुटुंबीयांचे प्रत्येकी आठ ते दहा हजार रुपयांप्रमाणे लाखो रुपये वाचणार आहेत.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सीपीआरला संलग्न करून २३ वर्षे पूर्ण झाली. मेंदू, हृदय, फुफ्फुस, हाडांसह शरीराच्या सर्वच अवयवांच्या काही आजारांची सूक्ष्म स्थिती सीटी स्कॅन यंत्रणेच्या माध्यमातूनही स्पष्टपणे दिसत नाही. त्यामुळे सीपीआरमध्ये येणाऱ्या रुग्णांना एमआरआयची गरज लागल्यास खासगी केंद्रातून एमआरआय करून घ्यावे लागायचे. यासाठी प्रत्येक रुग्णा पाठीमागे साधारणता आठ ते दहा हजार रुपये खर्च यायचा. सीपीआरमध्ये येणारे जिल्ह्यातील बारा तालुक्यांसह कर्नाटक, कोकणातील सर्वसामान्य रुग्णांना हा एमआरआयचा खर्चही सोसत नव्हता. त्यामुळे ही मशिनरी सीपीआरमध्ये बसवावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत होती.

# कोयनातीर नियतकालिक म्हणजे विद्यार्थ्यांच्या सृजनशक्तीचे व्यासपीठ : रो. संजीव चव्हाण

**पाटण :** विद्यार्थ्यांनी चांगले वाचन केले तर चांगले लिहू शकतात. कोयनातीर नियतकालिक हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यातील सृजनशील लेखनाला वाव देण्यासाठीचे व्यासपीठ आहे. असे मत कोयना एज्युकेशन शिक्षण संस्थेचे संचालक व पाटण रोटरी क्लबचे अध्यक्ष संजीव चव्हाण यांनी व्यक्त केले. ते येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात कोयनातीर या नियतकालिकाच्या प्रकाशन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी.पवार होते. यावेळी कोयनातीर नियतकालिकाचे मुख्य संपादक प्रा. डॉ. विनायक राऊत, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. सौ. एच. व्ही. काटे, जुनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. दीपक दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. विनायक राऊत यांनी प्रास्ताविकात अंकाची माहिती तसेच मुखपृष्ठ संकल्पना याबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर विभागीय संपादक यांचा सत्कार करण्यात आला व प्रमुख पाहुण्याच्या हस्ते अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

संजीव चव्हाण म्हणाले, विद्यार्थ्यांनी लिहिले पाहिजे, आपले अनुभव कथन केले पाहिजेत. सध्याचा विद्यार्थी हा मोबाईलमध्ये गुरफटला आहे. त्याने योग्य अशा कारणांसाठी मोबाईल वापरून अन्य वेळ अभ्यास, वाचन तसेच आपल्या व्यक्तिमत्व विकासाठी देणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. एस.डी. पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालय विविध उपक्रम राबवीत असते त्यामधील एक महत्वाचा उपक्रम म्हणजे कोयनातीर हे नियतकालिक होय. कॉलेजच्यावतीने दरवर्षी नियतकालिक प्रकाशित केले जाते.यामध्ये विद्यार्थी लेखांच्या विविध कलागुणांच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असतो. दरवर्षी आपल्या कॉलेजच्या अंकाला अनेक पारितोषिके मिळतात. यावर्षी सुद्धा आपण स्पर्धेत कुठेही कमी पडणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. सौ. एच. व्ही. काटे यांनी आभार मानले तर डॉ. श्रीनिवास पवार यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सूत्र संचालनाची धुरा सांभाळली. नियतकालिक प्रकाशनाच्या कार्यक्रमावेळी सर्व विभागीय संपादक, सर्व प्राध्यापक तसेच प्रशासकीय सेवक वर्ग उपस्थित होता.

# गोकुळच्या दूध दरात वाढ

**मुंबई :** कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळनेही दुधाच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. एक जुलैपासून ही दरवाढ लागू असणार त्यामुळे मुंबई आणि पुणे शहरात मिळणारे गोकुळचे दूध महाग झाल्यामुळे सर्वसामान्यांचे महिन्याचे बजेट कोलमडणार आहे.

गायीच्या दुधात प्रति लिटर दोन रूपये दरवाढ करण्याचा निर्णय दूध संघाने घेतला आहे. ही दरवाढ फक्त मुंबई आणि पुण्यासाठी लागू असणार आहे. या पुढे मुंबई आणि पुण्यात गोकुळचे गायीचे दूध प्रतिलिटर ५४ रूपये ऐवजी ५६ रूपयांनी मिळेल, अशी माहिती गोकुळ संघाचे अध्यक्ष अरूण डोंगळे यांनी दिली आहे.

दुधापासून बनणारे पदार्थ आणि दुधाची भूकटी यामध्ये मोठा तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे होणारा खर्च आणि तोटा याचा ताळमेळ बसवण्यासाठी गोकुळने दरवाढीचा निर्णय घेतल्याचे अरूण डोंगरे यांनी सांगितले. तसेच, राज्यातील इतरही दूध उत्पादक संघांनी दुधाच्या दरात वाढ केली आहे. त्यामुळे आता या सर्व गोष्टी लक्षात घेता गोकुळलाही दुधाच्या दरात वाढ करावी लागत आहे, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, जून महिन्याच्या सुरुवातीला मदर डेअरीकडून दुधाच्या दरात प्रति लिटर २ रुपये वाढ करण्यात आली होती. तर अमूलने देखील आपल्या दूध दरात प्रति लिटर २ रुपयांनी वाढ केली होती. त्यानंतर कर्नाटक मिल्क फेडरेशनकडून नंदिनी या दुधाचे दर वाढवले होते. आता गोकुळने दुधाच्या दरात वाढ केली आहे.

# येरळवाडी तलावाचे क्षेत्र वनसंवर्धन राखीव क्षेत्रातून वगळण्याबाबत केंद्राकडे राज्यशासन करणार शिफारस

## माण- खटाव मतदारसंघाचे आमदार जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नाने विधानभवनात बैठक संपन्न



**वडूज :** मायणी समूह संवर्धन राखीव क्षेत्रातून समूह क्रमांक ०२ येरळवाडी तलावाचे ६३३ हेक्टर क्षेत्र वगळण्याची शिफारस राज्यशासन त्वरित करणार असल्याची ग्वाही वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. गुरुवारी विधानभवनात आ. जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नातून आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. खटाव तालुक्यासाठी पिण्याच्या आणि शेतीपाण्याच्या बाबतीत तारणहार ठरणारे येरळवाडी धरण अधिसूचनेतून वगळण्यात येणार असल्याने परिसरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

मायणी समूह संवर्धन राखीव क्षेत्रातून समूह क्रमांक ०२ येरळवाडी तलावाचे ६३३ हेक्टर क्षेत्र अधिसूचनेतून वगळण्याबाबत आ. जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नातून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात झालेल्या बैठकीला आ. जयकुमार गोरे, मा. आ. दिलीप येळगावकर, मा. आ. प्रभाकर घार्गे, जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, सिध्दनाथ पतसंस्थेचे चेअरमन अरुण गोरे, रामभाऊ पाटील , नाना पुजारी , जालिंदर माळी , प्रकाश देवकर, गोरख देवकर, विजय (आबा) बागल, सलिम मुल्ला, विजय निकम , मोहन (बापू) बुधे , यांच्यासह येरळवाडी बनपुरी नडवळ आंबवडे गावातील प्रतिनिधी आणि वनविभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

याबाबत बोलताना आ. जयकुमार गोरे म्हणाले, खटाव तालुक्याच्या दुष्काळी भागासाठी येरळवाडी तलाव पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा एकमेव मोठा स्त्रोत आहे.

या तलावातून अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्यच्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर शेतीही या तलावातील पाण्यावर अवलंबून आहे. आमच्यासाठी हा तलाव अत्यंत महत्वाचा असताना आघाडी सरकारने चुकीचा निर्णय घेऊन मायणी समूह संवर्धन क्षेत्रात त्याचा समावेश केला. हा निर्णय घेताना स्थानिकांच्या लोकभावना विचारात घेण्यात आल्या नाहीत. आम्ही या निर्णयाच्या विरोधात आहोत. हा निर्णय रद्द करावा यासाठी आज विधानभवनात बैठक आयोजित करण्यात आली होती. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना आम्ही सर्व माहिती देवून हा तलाव आपल्यासाठी खूप महत्वाचा असल्याचे पटवून दिले. आघाडी सरकारने काढलेली अधिसूचना रद्द करण्याचा अधिकार केंद्र शासनाला असल्याने राज्यशासन त्वरित याबाबत केंद्राकडे शिफारस करणार आहे. लागू झालेली अधिसूचना निश्चित रद्द केली जाईल अशी ग्वाहीही वनमंत्र्यांनी दिल्याचे आ. गोरे यांनी सांगितले.

आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंचे चिरंजीव आदित्य ठाकरे यांच्या बालहट्टासाठी वन्यजीव संवर्धनाच्या नावाखाली येरळवाडी तलाव क्षेत्र मायणी समूह क्षेत्रात समाविष्ट करण्याची चूकीची अधिसूचना काढण्यात आली. त्यावेळी लोकभावना ध्यानात घेण्यात आली नाही. आम्ही या निर्णयाच्या विरोधात आहोत आणि काहीही झाले तरी सदर अधिसूचना लागू होवू देणार नाही असे आ. गोरेंनी सांगितले.

# जनता अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक लि., वाईच्या अध्यक्षपदी बळीराम हणमंत जगताप

## उपाध्यक्षपदी श्री. शेखर हणमंत फरांदे यांची बिनविरोध निवड

**वाई :** येथील सर्वसामान्यांची व प्रामुख्याने ग्रामीण भागाची अर्थवाहिनी असणा-या आणि जनतेची जनतेसाठी व जनतेबरोबर ह्या बिरुदावलीनुरुप काम करणारी सातारा जिल्ह्यातील अग्रगण्य अर्थसारथी असणा-या जनता अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकेची सन २०२२-२३ ते २०२७-२८ या कालावधीकरिताची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध संपन्न झाली होती. बँकेचे संस्थापक-अध्यक्ष सुरेशदादा कोरडे वाई यांनी अध्यक्ष पदाचा आणि श्री. जगन्नाथ पांडुरंग कदम (भाऊ) यांनी उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिलेने मा.संचालक मंडळाची सभा गुरुवार दि. ०४ जुलै २०२४ रोजी अध्यासी अधिकारी तथा वाईचे सहाय्यक निबंधक मा.श्री.अनिल क्षिरसागर यांचे अध्यक्षतेखाली बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची निवड करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये अध्यक्षपदी बँकेचे संचालक श्री.बळीराम हणमंत जगताप, उडतरे यांची आणि उपाध्यक्षपदी श्री.शेखर हणमंत फरांदे, ओझर्डे यांची बिनविरोध निवड झालेचे अध्यासी अधिकारी-निवडणूक अधिकारी मा.श्री.अनिल क्षिरसागर यांनी जाहीर केले.



निवड झालेनंतर अध्यासी अधिकारी तथा वाईचे सहाय्यक निबंधक अनिल क्षिरसागर यांनी नूतन अध्यक्ष बळीराम हणमंत जगताप आणि नूतन उपाध्यक्ष शेखर हणमंत फरांदे यांचे अभिनंदन करून त्यांना बँकेच्या पुढील कामकाजासाठी शुभेच्छ्ळ दिल्या.

या सभेस संस्थापक-संचालक सुरेशराव कोरडे, जगन्नाथ कदम, सौ.सुनंदा फरांदे, महेंद्र जमदाडे, निळकंठ मोरे, रमेश बुलुंगे, तज्ञ संचालक सीए श्री.चेतन कोदे व बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.रुपाली बुलुंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री.बळीराम जगताप यांची अध्यक्षपदी आणि श्री.शेखर फरांदे यांची उपाध्यक्षपदी निवड झालेबद्दल त्यांना सर्व संचालक, कर्मचारी वृंद, दैनंदिन ठेव प्रतिनिधी तसेच बँकेचे सन्मानिय सभासद व सामाजिक कार्यकर्ते अविनाश फरांदे, ॲड.दिनेश धुमाळ, ऋतुराज पिसाळ, विठ्ठल फरांदे, बाळासो जगताप, वसंत शिंदे, प्रथमेश जाधव, कैलास जमदाडे, सतीश जगताप, मच्छिंद्र जगताप, सागर फाटक, पत्रकार दत्तानाना मर्ढेकर, भद्रेश भाटे आदींनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या.

श्री.बळीराम जगताप आपल्या निवडीबद्दल बोलताना म्हणाले, नूतन उपाध्यक्ष, संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, सभासद व हितचिंतक या सर्वांच्या सहकार्याने बँकेच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहीन. बँकेचा नावलौकीक वाढविण्यास निश्चितच मदत करेन. बँकेची आर्थिक स्थिती अतिशय भक्कम असून बँकेची सर्वांगीण प्रगती लवकरच सर्वांना पाहायला मिळेल, अशी श्री.बळीराम जगताप यांनी ग्वाही दिली. तसेच उपाध्यक्ष श्री.शेखर फरांदे यांनी सर्व संचालक सदस्यांनी बँकेच्या हितासाठी आणि सर्वांगीण प्रगतीसाठी एकत्रितपणे अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड बिनविरोध केल्याबद्दल आभार मानले.

# मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा पळशीत शुभारंभ

## सर्व दाखले गाव वातळीवर एकत्र करण्याचा ग्रामसभेत निर्णय

**खंडाळा :** मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी लागणारे सर्व दाखले गावांमध्येच एकत्र करून लाभ देण्याचा ऐतिहासिक निर्णय पळशी ता.खंडाळा येथे झालेल्या ग्रामसभेत घेण्यात आला .पळशी ता.खंडाळा येथे सुमारे १५०० ग्रामस्थांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या माहितीसाठी ग्रामसभेचे आयोजन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नितीन भरगुडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते.

यावेळी खंडाळा तालुक्याचे तहसीलदार अजित पाटील,गटविकास अधिकारी अनिल वाघमारे,मंडल अधिकारी संतोष नाबर उपस्थित होते. दरम्यान,मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा जिल्ह्यातील पळशी (ता. खंडाळा) येथे पहिली ग्रामसभा पार पडली . या योजनेबाबतचे सर्व दाखले गावांमध्येच एकत्र करण्याचा निर्णय घेण्यात आला .

यावेळी सरपंच हेमलता गायकवाड , उपसरपंच गजानन भरगुडे,सदस्य कुंदन गोळे,एकनाथ भरगुडे,सुजित दगडे, किरण राऊत,अरुण भोसले,शेखर चव्हाण,सोसायटीचे चेअरमन शामराव भरगुडे,माजी सरपंच रमेश भरगुडे, प्रकाश दगडे,सिद्धेश्वर राऊत,विलास चव्हाण,शांताराम भरगुडे,तलाठी शिर्के, ग्रामसेवक नंदकुमार यादव,तुषार दगडे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष राजेंद्र भरगुडे, एकात्मिक बाल विकास योजनेच्या मगदूम,अंगणवाडीच्या सेविका आदी उपस्थित होते.

सुमारे पंधराशे महिला व पुरुष यांची ग्रामसभा घेऊन मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ पळशी येथे तहसीलदार अजित पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. त्यासाठी सर्व लागणारे कागदपत्रे ग्रामपंचायत,सोसायटी यांनी पुढे लागून करण्याचा निर्णय करण्यात आला.एक आदर्श निर्णय सातारा जिल्ह्यामध्ये करून देण्याचा मान पळशी ग्रामस्थांनी मिळवला आहे.

# घरफोडीतील अट्टल आरोपी वाढे फाटा येथे जेरबंद



## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**सातारा :** विसावा नाका येथील अभिनेत्री श्वेता शिंदे यांच्या घरी झालेल्या चोरीचा पर्दाफाश स्थानिक गुन्हे शाखेने केला आहे. या घरफोडी प्रकरणातील अट्टल आरोपी राजकुमार उर्फ राजू ओंकाराप्पा आपचे, राहणार कोथळी, तालुका उमरगा, जिल्हा धाराशिव याला स्थानिक गुन्हे शाखेने वाढे फाटा येथे जेरबंद करून ताब्यात घेतले त्याच्याकडून १८.३ तोडे वजनाचे १३ लाख ३१ हजार ४०० रुपये किमतीची सोने चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत आरोपीने तीन घोरफोडी केल्याची कबुली दिली आहे.

याबाबतचे अधिक माहिती अशी जून २०२४ मध्ये गोरखपूर पिरवाडी येथे प्रसिद्ध अभिनेत्री दिग्दर्शिका श्वेता शिंदे यांच्या मातोश्रीच्या बंगल्यामध्ये चोरी झाली होती. स्थानिक गुन्हे शाखेने या गुन्ह्याची गंभीर दखल घेऊन तातडीने तपासाची पावले उचलली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना गोपनीय बातमीदाराकडून घरफोडी प्रकरणातील आरोपी सातारा तालुक्यात फिरत असल्याची माहिती मिळाली त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक पृथ्वीराज साठे, रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे, अमित पाटील या पथकाने वाढे फाटा येथून आपचे याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने सातारा शहर भुईंज व लोणंद येथे तीन घरफोड्या केल्याची कबुली दिली तीन घरफोड्यामधील १८.३ तोळे वजनाचे सोन्या चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत त्याची बाजारभावाप्रमाणे १३ लाख ३१ हजार ४०० रुपये इतकी किंमत आहे तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्प्लेंडर मोटरसायकल सुद्धा जप्त करण्यात आली आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेने आतापर्यंत नोव्हेंबर २०२३ पर्यंत घरफोडी दरोडा जबरी चोरी या प्रकरणातील २९२ गुन्हे उघड केले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने आतापर्यंत ६ किलो ८४५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले असून ४ कोटी ७८ लाख ३१ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.